रे.दि.मु.नं. ११०/२०१२ मधील निशाणी क्रमांक ५६ खालील आदेश.

१. वादी तर्फे प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिदाव्यामध्ये दुरुस्त करण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादीनी सदरचा दावा प्रतिवादींचे विरुध्द प्रतिवादी यांनी वादीचे दावा मिळकतीमधील कुळ हक्काचे व कब्जे वहिवाटीस हरकत व अडथळा करु नये व त्यांना दावा मिळकतीमधुन हुसकावून लावू नये. तसेच दावा मिळकतीचे विक्री अगर तबदीलीचे व्यवहार करु नयेत म्हणून प्रतिवादी यांना निरंतरची मनाईसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीच्या रेकॉर्डला वादी व प्रतिवादी नं. २ यांचे पुर्वजांची कुळ म्हणून असणारी नोंद प्रतिवादी नं. १ व १अ यांनी संगनमतानी कमी करुन घेतल्याची तक्रार वादींनी दाव्यात केली आहे. त्याविरुध्द वादींनी टेनन्सी अपील दाखल केलेले असल्याचे देखील दाव्यात नमुद केलेले आहे. प्रस्तुतचा दावा प्रलंबित असताना सदर टेनन्सी अपिलाचे कामी निकाल होऊन प्रकरणे फेरचौकशीसाठी मे. नायब तहसिलदार तथा मे. टेनन्सी अव्वल कारकुन, शिराळा यांचेकडे पाठविण्यात आले. त्याकामी दि. २८/०२/२०१४ रोजी निकाल होऊन वादी व प्रतिवादी नं. २ यांचा दावा मिळकतीत कुळहक्क असल्याचा निर्णय झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे वादी व प्रतिवादी नं. २ यांचे नांवची नोंद दावा मिळकतीच्या रेकॉर्ड ऑफ राईटला फेरफार नं. १८१३ घेतलेली आहे. याप्रमाणे दावा प्रलंबित असताना घडलेल्या घटनासंबंधीचा मजकुर खुलासा दाव्यामध्ये येणे आवश्यक आहे. त्यासाठी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेकरीता वादींनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीबाबतचे झालेले दस्त बेकायदेशीर व अनाधिकाराचे आहेत. संबंधीत खरेदी देणा-या व्यक्तीला म्हणजेच प्रतिवादी नं. १ व १अ यांना व त्यांचेतर्फे इतर कोणालाही दावा

मिळकतींचे खरेदी अगर तबदीलीचे व्यवहार करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. खरेदी व्यवहारातील खरेदी घेणार म्हणून नमूद असणा-या व्यक्तींना या दाव्याच्या कामी पक्षकार म्हणून सामील करुन त्यांचे विरुध्द ताकीद वगैरे स्वरुपाच्या दादी मागणे जरुरीचे आहे. त्यामुळे या एकाच दाव्याचे कामी सर्व वादाचे निराकरण होऊ शकणार आहे. यासाठी दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

दाव्याचे सरनाम्यात प्रतिवादी नं. २ नंतर संबंधीत खरेदी घेणार व्यक्तींची नांवे, पत्ते वगैरे मजकुर लिहण्यास परवानगी मागितली आहे. दावा कलम ८ नंतर नवीन कलम ८अ लिहून त्यापुढे जादा मजकुर लिहीण्यास परवानगी मागितली आहे. दावा कलम १० नंतर १०अ व १०ब हे नवीन कलम घालून त्यात जादा मजकुर लिहीण्यास देखील परवानगी मागितली आहे. दावा कलम १२ मध्ये शेवटच्या सतत घडत आहे या मजकुरानंतर जादा मजकुर लिहण्यास परवानगी मागितली आहे. दावा कलम १३ मधील स्टॅप्म दिला आहे यापुढे व दावा कलम १८ मधील उपकलम अ नंतर नवीन उपकलम अ१ लिहण्यास व त्यामध्ये जादा मजकुर लिहण्यास परवानगी मागितली आहे. दाव्याचे सरनाम्यानंतर नमुद केलेला दावा रुपये १०००/- व दावा विषयाची किंमत रक्कम रु. १०००/- या मजकुरातील रुपये १०००/- यास काट देण्यास व त्या ठिकाणी रुपये २०००/- असा मजकुर लिहण्यास परवानगी मिळावी असे कथन केले आहे.

३. प्रतिवादी नं. १अ यांनी वादीचे दाव्यातील दुरुस्ती अर्जास त्यांचे म्हणणे अर्जावरच दाखल केलेले आहे. वादी यांचा अर्ज खोटा व लबाडीचा असून सर्वस्वी बेकायदेशी आहे. प्रतिवादी नं. १अ प्रकाश यशवंत टिटवे यांनी स्वतः कोणतेही खरेदीपत्र करुन दिलेले नाही. प्रतिवादी म्हणुन मुखत्यार याकामी हजर आहेत. त्यांचा प्रतिवादी नं. १अ शी कसलाही संबंध राहिलेला नाही व मुखत्यारपत्र पूर्वीच रद्द केलेले आहे. सदर मुखत्यार यांनी केलेल्या

खरेदी व्यवहाराची व तेथुन पुढे झालेल्या सर्व खरेदी व्यवहाराची या वादींना पुर्वीपासून माहिती असताना सदरचा दुरुस्ती अर्ज देण्यास वादी यांनी जाणीवपूर्वक विलंब केलेला असून झालेल्या विलंबाचे कोणतेही कारण अर्जात नमुद नाही. विलंबाचा कालावधी पाहता वैकल्पीक रित्या म्हणणे की वादी यांना प्रतिवादी नं. १अ यांना कमीत कमी २०००/- रु. मात्र इतकी कॉस्ट देणेचा आदेश करणेत यावा, असे कथन केले आहे.

४. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ नुसार दाव्याच्या कोणत्याही टप्प्यामध्ये वादी किंवा प्रतिवादींना आपल्या कथनामध्ये दुरुस्ती करता येते. सदरची दुरुस्ती ही वादी व प्रतिवादी यांचे मधील वादप्रश्न कायम स्वरुपी संपुष्टात येण्याकरिता असावीत. वादीने प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी दाखल केला आहे. वादी व प्रतिवादी नं. २ हे त्यांचे वाडवडिलांपासून दावा मिळकत कुळ हक्काने वहिवाटीत आहेत. दावा प्रलंबित असताना खरेदीचे दस्त झालेले आहेत. त्यामुळे दावा प्रलंबित असताना दावा मिळकतीत झालेले बदलाची माहिती पटलावर येणे आवश्यक आहे. अन्यथा दावा निरर्थक होऊ शकतो. त्यामुळे दोन्ही पक्षकारांचा न्याय निवाडा योग्य त्या कायदेशीर तत्वांवर होणे गरजेचे आहे. सदरची बाब पटलावर आल्यास मूळ दावेचे स्वरुप बदलणार नाही. त्यामुळे दावा गुण दोषावर चालणेस मदत होणार आहे. तसेच वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद पाहता सदरची बाब न्यायिक दृष्टया दाव्यामध्ये समाविष्ट होणे गरजेचे दिसते. दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी मागत असलेली दुरुस्ती ही औपचारिक स्वरुपाची असून ती मंजूर केलेस वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याचबरोबर वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायम स्वरुपी संपुष्टात येण्याकरिता प्रतिवादी मागत असलेली दुरुस्ती मंजूर होण्यास पात्र आहे. याउलट सदरची दुरुस्ती मंजूर न केलेस दाव्याच्या अंतिम निर्णय देण्यास गुंतागुंत निर्माण होऊन वादी व प्रतिवादी यांच्यातील वाद कायम स्वरुपी

संपुष्टात येणार नाही. सबब पुढीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

आदेश

१. वादींचा नि.क्र. ५६ वरील अर्ज र.रु. ५००/- चे खर्चावर मंजूर करण्यात येत आहे. पैकी र.रु. २५०/- विधी सेवा प्राधिकरणाकडे जमा करणेचे आहेत व र.रु. २५०/- प्र.वादीस खर्च म्हणून देण्याचे आहेत.

२. वादींनी आजपासून ४ दिवसाच्या आत दाव्याची दुरुस्ती करुन दावा दुरुस्तीप्रत दाखल करणेची आहे.

सही/-

शिराळा. (बी.आर पाटील)
दिनांकः- ०५/०८/२०१७ सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, शिराळा